ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# कृषीवर उपजिविका करणाऱ्या भुमिहीन शेतमजुराच्या संदर्भात सत्य ठरलेली गृहीतके

**प्रा. डॉ. चंद्रशेखर रा. भेजे**
समाजशास्त्र विभागप्रमुख, आर्टस् कॉलेज, सिहोरा,
त. तुमसर, जि. भंडारा

भारत हा कृषीप्रधान देश आहे. यातील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. भारतातील ग्रामीण भागातील लोकांचे रोजगाराचे साधन म्हणजे शेती होय. भारतातील समाजव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण असे महत्व आहे. प्राचिन काळापासुन खेडयाची अर्थव्यवस्था ही शेती व शेती संबंधीत व्यवसायावर अवलंबुन आहे. म्हणजेच भारत देशाची फार मोठी जनसंख्या शेतीवर अवलंबुन आहे. ''1991 च्या आकडेवारीनुसार एकुण श्रमीकांपैकी 68 टक्के लोक शेती व्यवसायामध्ये गुंतलेले दिसुन येतात. ग्रामिण भारतातील मोठया लोकसंख्येला रोजगार पुरविण्याचे काम शेतीने केले आहे. अशा या शेतीवर राबणाऱ्या श्रमिकांपैकी एक भुमिहीन शेतमजुर हा आहे. भारतात भुमिहीन शेतमजुरांचे प्रमाण बरेच अधिक आढळते. शेतकरी लोकांपैकी 18 ते 20 टक्के लोक भुमिहीन आहेत.''

भारतात ग्रामीण विभागातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय शेती असला तरी ते शेतीकडे एक व्यवसाय म्हणुन न पाहता एक उपजिवीकेचे साधन या दृष्टीने पाहतात. स्वतःच्या मालकीची शेती नसल्यास दुसऱ्याच्या शेतीत स्वतःचे श्रम विकुण उत्पन्न मिळविणे अथवा शेती उत्पादनासाठी उपयुक्त सेवा पुरवून उत्पन्न मिळविणे या मार्गाने भुमिहीन शेतमजुर उत्पन्न मिळवितात. हा गट शेतात काम करतो, ते मजुरी मिळविण्याच्या उद्देशाने. भुमिहीन शेतमजुरांना उत्पन्नातील नफा मिळत नाही. मिळतो तो केवळ दिवसभर केलेल्या श्रमाचा मोबदला व या मोबदल्यातच हा भुमिहीन शेत मजुर सुख समाधान मानुण आपले आयुष्यातील जिवनाचे स्वप्न रंगवित असतो.

जमीन दार, मोठे शेतकरी, मध्यम शेतकरी, अल्प भुरधारक आणि भुमिहीन शेत मजुर हे वर्ग भारतीय खेडयात प्राचिन काळापासुन दिसतात. प्राचिन काळात भारतीय शेतकरी सधन होता. परंतु कालांतराने ग्रामिण क्षेत्राचे अधःपतन झाले व एकेकाळी सोन्याचे पिक घेणारा शेतकरी गरीब झाला. व आज शेतमालकाचा भुमिहीन शेतमजुर झाला. हा भुमिहीन शेतमजुर वर्षानुवर्ष अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडुन आहे. दारिद्रय, बेकारी, उपासमार, आर्थीक शोषण, पिळवणुक, कर्जबाजारीपणा, व्यसनाधिनता हया भुमिहीन शेतमजुरांच्या महत्वाच्या समस्या आहेत. भुमिहीन शेतमजुरांची स्थिती अत्यंत खालावलेली आणि दयनिय आहे. हे फारच गरीब असुन अतिशय निकृष्ठ स्वरूपाचे जिवन जगतात. यांचे जिवन गरीबी शोषण व अनिश्चीततेने युक्त आहे. काही ठिकाणी तर भुमिहीन शेतमजुरांची स्थिती गुलामासारखी असल्याचे दिसुन येते.

भुमिहीन शेतमजुर कोणाला म्हणावे असा प्रश्न अभ्यासकांना पडतो. खालील व्याख्यावरून भुमिहीन शेतमजुरांचा अर्थ स्पष्ट होण्यास मदत होते.

**1) राष्ट्रीय श्रम आयोग** : ''भुमिहीन शेतमजुर ते आहेत की, जे अकुशल व अव्यवस्थित आहेत. ज्यांच्याजवळ जिवीकोपार्जनासाठी श्रमाव्यतिरीक्त काहीही नाही, ज्यांचा अर्थप्राप्तीचा सर्वात जास्त भाग शेतीच्या मजुरीवर अवलंबुन असतो.''

**2) 1961 च्या जनगणनेनुसार** : ''त्या व्यक्तीला भुमिहीन शेतमजुर म्हटल्या गेले की, जे दुसऱ्याच्या शेतीवर शेतमजुरी करतात आणि ज्यांना नगदी अथवा वस्तुच्या स्वरूपात उत्पादनाचा मोबदला मजुरी म्हणुन दिला जातो.''

स्वतःच्या घराव्यतिरीक्त काहीही शेतजमीन नसणारी व एकूण मिळकतीच्या 50 टक्क्यापेक्षा जास्त उत्पन्न शेतातील मजुरीपासुन मिळविणारी व्यक्ती म्हणजे भुमिहीन शेतमजुर होय, म्हणजेच शेतजमिनीवर मुळीच मालकी नसलेल्या व उपजिवीकेसाठी ईतरांच्या शेतजमिनीवर परिश्रम करणाऱ्या व्यक्तीस 'भुमिहीन शेतमजुर' असे म्हणतात.

भारतीय शेती व्यवस्थेत परिवर्तने जरूर झाली परंतु पुर्वी जी कुळे होती त्यांच्यापैकी अनेक कुळे आज जमिन मालक शेतकरी बनली आहेत. पण ज्यांना आपला दर्जा कागदोपत्री टिकविता आला नाही, वा सिध्द करता आला नाही, वा जे निव्वळ रोजंदारीवर शेतमजुरी करून पोट भरत होती असा एक मोठा वर्ग ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या तळाशी कसा शिल्लक राहीला व तो मोठा समुह भुमिहीन शेतमजुरांच्या यादीत ढकलल्या गेला व भुमिहीन शेतमजुर म्हणुन समाजात ओळखल्या जावू लागला. अजही खेडयापाडयात मोठया संख्येने भुमिहीन शेतमजुर कुटूंबे

भरपुर प्रमाणात आढळुन येतात. ज्यांना स्वतःची जमीन नाही. उपजिवीकेचा अन्य निश्चीत व स्थिर व्यवसाय नाही. किंवा ज्यांचा असलेला व्यवसाय बंद पडला त्यांच्यासाठी शेतमजुरी हाच एक आधार म्हणुन ठरतो.

कृषी शेतमजुरांचा भरपुर वर्ग एकोणविसव्या शतकात विद्यमान नव्हता. परंतु लोकसंख्येमध्ये वाढ झाल्यामुळे, शेतीवर लोकसंख्येचा भार, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा व शेतीचे हस्तांतरणाची सरळ पध्दत तसेच ग्रामिण उद्योगधंदयाचा ऱ्हास इत्यादी कारणामुळे विसाव्या शतकामध्ये फार मोठया प्रमाणात भारतात 'भुमिहीन शेतमजुर' यांचा वर्ग उदयास आला. ग्रामीण वर्गव्यवस्थेमध्ये सर्वात कनिष्ठ स्थान शेतमजुरांचा आहे. भुमिहीन शेतमजुर असा एक मोठा वर्ग आज भारतभर अस्तित्वात आहे. पण हा वर्ग नेहमीच अस्तित्वात नव्हता. हा वर्ग ब्रिटीश राजवटीच्या प्रस्थापणेमधुन त्या राजवटीने अंगिकारलेल्या धोरणामधुन उदयास आला.

भुमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध ययनातुन खालील गृहीतके निष्पन्न झाली असल्याचे दिसुन येते. भुमिहीन शेतमजुर हा खरा कष्टकरी व श्रमजिवी असुन त्याचे आर्थिक शोषण केले जाते. अत्यंत कमी मजुरीवर त्याला राबवुन घेतले जाते. अशा स्थितीत त्याची कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक स्थिती फार हिन दर्ज्याची असल्याचे आढळते. संशोधनाअंती भुमिहीन शेतमजुरांच्या संदर्भात खालील गृहितके निष्पन्न झाली.

1) भुमिहीन शेतमजुरांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावलेला नाही.

व्यक्तीच्या उत्पन्नावर त्याची आर्थिक स्थिती अवलंबुन असते व त्याच्या आर्थिक स्थितीचा व्यक्तीच्या राहणीमानाशी सबंध असतो. आर्थिक स्थिती सुदृढ असेल तर त्याचा राहणीमान सुध्दा उंचावलेला दिसतो. पण भुमिहीन शेतमजुरांचे उत्पन्न हे फार कमी असल्यामुळे आर्थिक स्थिती सुध्दा निम्न स्वरूपाचे आढळुन येते. अनेक कुटूंबात केवळ एकच व्क्ती अर्थोत्पादन करतो. त्यामुळे अशा कुटूंबाचे मासिक उत्पन्न फारच कमी असते. काही कुटूंबात कमावणारा व्यक्ती एक असतो व खाणाऱ्या व्यक्ती चार पेक्षा जास्त असतात. उत्पन्न कमी व खाणाऱ्या व्यक्ती जास्त अशा वेळेस व्यक्तीच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्याची स्थिती शक्यच नसते.

उत्पन्नाचा सबंध त्यांच्या निवासस्थनाशी असल्याचे दिसुन येते. ज्यांचे उत्पन्न जास्त आहे, ते विटाच्या पक्क्या घरात वास्तव्य करतात. परंतु अल्प उत्पन्नामुळे बरेच भुमिहीन शेतमजुर आजही कच्च्या मातीच्या घरात वास्तव्य करीत आहेत. कित्येक भुमिहीन शेतमजुर कुडाच्या घरात राहतात. वरिल स्थितीवरून भुमिहीन शेतमजुर दयनिय स्थितीत वास्तव्य करीत असल्याचे दिसुन येते. भुमिहीन शेतमजुर आपल्या मुलांबाळासोबत केवळ दोनच खोल्यांमध्ये वास्तव्य करीत असतांना दिसते. भुमिहीन शेतमजुर ज्या घरात राहतात ते घर स्वच्छ व हवेशिर नसल्यामुळे त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला दिसतो.

जास्तीत–जास्त भुमिहीन शेतमजुरांचा खर्च केवळ कौटूंबिक गरजा भागविण्यावरच होत असतो. त्यातही त्यांचे मासिक उत्पन्न हे फारच कमी असल्याचे दिसते. अर्थात भुमिहीन शेतमजुरांची आर्थीक स्थिती अत्यंत हलाकीची असल्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावलेला नाही हे विधान सत्य असल्याचे दिसुन येते.

2) अत्यल्प अर्थोत्पादनामुळे भुमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा घडुन आलेली नाही.

भुमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीवरून त्यांची सामाजिक स्थिती ठरविली जाते. सामाजिक स्थिती ठरविण्यासाठी पैसा हा घटक तितकाच महत्वपुर्ण मानला जातो. पैसा ही बाब व्यक्तीची समाजात प्रतिष्ठा टिकविण्यासाठी महत्वुपर्ण असते. अनेक भुमिहीने शेतमजुर उत्पन्न कमी असल्यामुळे मनाप्रमाणे पैसा खर्च करू शकत नाही. कितीतरी भुमिहीन शेतमजुर कोणत्या ना कोणत्या व्यवसनांच्या आहारी गेलेले दिसुन येतात. अनेक भुमिहीन शेतमजुर वर्षातुन केवळ 6 ते 8 महीनेच शेतमजुरी मिळवितात. भुमिहीन शेतमजुर वेळेअभावी व पैशा अभावी प्रत्यक्षरित्या सामाजिक कार्यात भाग घेवू शकत नाही. पैशाअभावी काही शेतमजुर एकटेच सामाजिक कार्यात सहभागी होतात. वर्षातुन थोडेच दिवस काम असल्यामुळे उत्पन्न कमी असते. व मिळालेल्या श्रमाचा मोबदला सुध्दा जास्तीत जास्त भुमिहीन शेतमजुर व्यवसनांमध्ये खर्च करतात. त्यामुळे व्यसनी व्यक्तीकडे समाजातील ईतर लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोण हा हिन असतो. अशा व्यसनी व्यक्तीला समाजात कोणीतीही सामाजिक प्रतिष्ठा मिळत नाही. त्यांना वर्षभर काम मिळत नसल्यामुळे त्यांच्या सामााजिक स्थितीमध्ये सुधारणा घडुन येत नाही. त्यामुळे वरील सर्व स्थितीवरून भुमिहीन शेतमजुरांच्या समाजिक स्थितीमध्ये सुधारणा घडुन आलेली नाही. हे विधान सत्य ठरण्यास मदत होते.

3) श्रमाच्या तुलनेत भुमिहीन शेतमजुरांना दिली जाणारी मजुरी अत्यंत अल्प आहे.

भुमिहीन शेतमजुर हा शेतीमध्ये राब राब राबतो परंतु त्याच्या

तुलनेत त्याला फार कमी मजुरी दिली जाते. भुमिहीन शेतमजुर हे केवळ शेतीचेच काम करतात. शेती व्यतिरीक्त हे शेतमजुर अन्य काम करीत नाही. म्हणजेच केवळ शेतीच्याच मजुरीवर यांची रोजी रोटी अवलंबुन असते. बऱ्या भुमिहीन शेतमजुरांना 6 ते 8 तास शेतमालकाकडे घाम गाळुनही फारच कमी मजुरी दिली जाते. प्रत्येक दिवसाची मजुरी ही फार कमी आहे. दिवसभर कष्ट करूनही मिळणाऱ्या मजुरीचा दर अल्प आहे. त्यामुळे हा भुमिहीन शेतमजुर आपल्या व कुटूंबियांच्या आवश्यक गरजांची परिपुर्ती या शेतमजुरीच्या दरात पुर्ण करणे शक्य नाही. त्यामुळे वरील स्पष्टीकरणावरून भुमिहीन शेतमजुरांना दिली जाणारी मजुरी अत्यंत अल्प आहे. हे विधान सत्य ठरण्यास मदत होते.

4) भुमिहीन शेतमजुरांना मिळणारा रोजगार हा हंगामी स्वरूपाचा असल्यामुळे त्यांची कौटुबिक स्थिती निम्न दर्जाची आहे. निसर्गाच्या लपंडावाचा सुध्दा शेतमजुरांच्या मजुरीशी सबंध दिसुन येतो. त्यातही शेतीचे काम शेतमजुरांना संपुर्ण वर्षभर शेतीतुन मिळत नाही. केवळ हंगामातच शेतमजुरांना काही दिवसाकरिताच शेतमजुरी मिळत असते. त्यामुळे उपासमार, कर्जबाजारीपणा, दारिद्रयता, मद्यपान सेवन ईत्यादी बाबीना कुटूंबात उत आलेला दिसुन येतो. श्रम करण्याची क्षमता भुमिहीन शेतमजुरांमध्ये असुनही कष्ट करणाऱ्या हाताला वर्षभर काम मिळत नसल्यामुळे अशा कुटूंबात नैराश्याचे वातावरण निर्माण होते. व कुटूंब प्रमुखाला कुटूंबाचे उदरनिर्वाह करणे कठिण होऊन बसते. भुमिहीन शेतमजुर केवळ 180 ते 240 दिवस म्हणजेच 6 ते 8 महिनेच शेतमजुरीचे काम करतात. व अन्य वेळेस या मजुरांना अन्य कुठेही काम मिळण्याची शाश्वती नसते. भुमिहीन शेतमजुर हे केवळ शेतमजुरीच करतात. त्यामुळे ज्या काळात हंगाम असतो त्याच काळात वरील शेतमजुर शेतमजुरी मिळवितात व बाकीचे दिवस कोणतेही काम करीत नसल्यामुळे अशा कुटूंबाची कौटुंबिक स्थिती निम्न दर्जाची असल्याचे दिसुन येते.

कामाचे हंगामी स्वरूप असल्यामुळे उत्पन्न कमी असते. त्यामुळे हया भुमिहीन शेतमजुराच्या कुटूंबातील सदस्यांच्या गरजा पुर्ण केल्या जात नाही. कारण उत्पन्न कमी व खर्च जास्त यामुळे त्यांची कौटुंबिक स्थिती निम्न दर्जाची दिसुन येते.

5) शेतमजुरी कमी असल्यामुळे असंख्य भुमिहीन शेतमजुर कर्जबाजारी आहेत. भुमिहीन शेतमजुरांचे वार्षीक उत्पन्न कमी आहे त्यामुळे त्यांना आपल्या अडचणी महिण्याला प्राप्त होणाऱ्या मजुरीमध्ये पुर्ण करणे शक्य नसते. दैनंदिन गरजा व्यक्तीरीक्त ऐनवेळी होणारे खर्च सुध्दा शेतमजुरांना करावे लागते. याखेरीज अनेक प्रकारचे उत्सव, सण, प्रथा, परंपरा, समारंभ या सर्व बाबींचे भान शेतमजुरांना ठेवावे लागते. वरिल सर्व गरजांची परिपुर्ती दैनंदिन प्राप्त होणाऱ्या शेतमजुरीवर पुर्ण करणे कठीण असते. प्राप्त होणाऱ्या शेतमजुरीचे नियोजन करणाऱ्या शेतमजुरांना केवळ शेतमजुरीतच आपला उदरनिर्वाह करावा लागतो की, ज्यांना इतरत्र हात पसरण्याची गरज नसते. पण बहुतेक भुमिहीन शेतमजुर नियोजन पुर्वक खर्च करीत नसल्यामुळे त्यांचे आर्थिक संतुलन बिघडते व त्यांना इतरांकडुन कर्ज घेवून कर्जबाजारी होण्याची वेळ दिसुन येते. लग्नसमारंभ, आर्थिक अडचण, शिक्षण, आरोग्य, घर बांधणी इत्यादीसाठी भुमिहीन शेतमजुर मित्र, सावकार, नातेवाईक, बॅका, सहकारी संस्था, इत्यादींची मदत घेत असतात. यापैकी काही भुमिहीन शेतमजुर सावकाराच्या बाहुपाशात अडकल्याचे दिसुन येते. सावकाराकडुन कर्ज घेणाऱ्या भुमिहीन शेतमजुरांचे प्रमाण इतरांच्या तुलनेत जास्त असल्याचे दिसुन येते. त्यामुळे बहुसंख्य भुमिहीन शेतमजुर कर्जबाजारी आहेत हे विधान सत्य ठरण्यास वरिल स्पष्टीकरण महत्वपुर्ण ठरते.

6) भुमिहीन शेतमजुरांना कायदयाचे पुरेसे संरक्षण नसल्यामुळे शेतमालकाकडुन मोठया प्रमाणावर आर्थिक शोषण केले जाते. भुमिहीन शेतमजुरांचा वर्ग हा असंघटीत लोकांचा वर्ग असुन तो ग्रामिण भागात ईकडे–तिकडे विखुरलेला असल्याचे दिसुन येते. त्यांच्यात संघटन शक्ती नाही त्यापलीकडे सुध्दा आपल्या हक्काची जाणीव सुध्दा झालेली नाही. त्यामुळे त्यांचा अनेक मोठे शेतकरी, सावकार, जमिनदार गैरफायदा घेत असल्याचे दिसते. त्याचाच एक परिणाम म्हणुन त्यांना किमान वेतन कायदयानुसार शेतमजुरी दिली जात नाही. किमान वेतन कायदा जरी असला तरी त्यांना त्यानुसार मजुरी दिली जात नाही. याचे कारण म्हणजे वर्षातुन मिळणारा हंगामी स्वरूपाचा अल्प रोजगार व त्यातही शेतमजुरांचे असणारे प्रमाण जास्त होय. त्यामुळे शेतमालकाने ठरवुन दिलेल्या वेळेनुसार व शेतमजुरी नुसारच मजुरांना वागावे लागते. ठरवुन दिलेल्या कामापेक्षा अतिरीक्त श्रम करणारे, अतिरीक्त श्रम करून काहीच न बोलणारे, शेतमालकाच्या विरोधात न जाता चुप बसणारे आणि त्यातच समाधान माननारे अनेक भुमिहीन शेतमजुर हया कृषी व्यवसायात काम करतांना दिसतात. तक्रार करणारा एकही भुमिहीन शेतमजुर दिसुन येत नाही. कायदयाने पुरेशे संरक्षण दिलेले नसल्यामुळे, कमी वेतनावर जास्त वेळ राबवुन घेणे, अतिरीक्त श्रमाचा मोबदला न देणे ईत्यादी बाबींना भुमिहीन शेतमजुरांना तोंड दयावे लागते. यावरून शेतमजुरांच्या समस्या सोडविण्यात योग्य प्रमाणात कायदयाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे भुमिहीन शेतमजुरांना कायदयाने पुरेस

संरक्षण दिलेले नाही हे विधान सत्य ठरण्यास मदत होते.

**निष्कर्ष :**

1) अल्प उत्पन्नामुळे बहुसंख्य भुमिहीन शेतमजुर कर्जबाजारी असल्याचे दिसुन येते.
2) आजही शेतमालकाकडुन भुमिहीन शेतमजुरांचे आर्थीक शोषण होत असल्याचे दिसुन येते.
3) भुमिहीन शेतमजुरांना मिळणारा रोजगार हा हंगामी स्वरूपाचा असल्यामुळे त्यांची आर्थीक स्थिती निम्न दर्जाची असल्याचे आढळुन येते.
4) भुमिहीन शेतमजुरांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभाविपणे होत नसल्याचे दिसुन येते.
5) भुमिहीन शेतमजुरांची कौटुंबिक स्थिती निम्न स्वरूपाची आहे. त्यांचे वास्तव्य अतिशय निकृष्ठ अशा घरात असल्यामुळे त्यांचे राहणीमान निकृष्ठ प्रतिचे असल्यचे दिसुन येते.
6) भुमिहीन शेतमजुरांचे कौटुंबिक जिवन अत्यंत दुःखी असल्याचे दिसुन येते.
7) आर्थिक घटक भुमिहीन शेतमजुरांच्या सर्व समस्यांची जननी असल्याचे दिसुन येते.

**उपाय :**

1) आर्थिक स्थिती सुदृढ होता यावी म्हणुन वर्षभर रोजगार प्राप्त करून दयावा. त्यासाठी अनेक उद्योग धंदयाची निर्मिती करण्यात यावी.
2) भुमिहीन शेतमजुरांना अनुदानात्मक आर्थिक सहाय्य देण्यात यावे. जेणे करून त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.
3) भुमिहीन शेतमजुरांना घरकुल योजनेतंर्गत जागेची व घर बांधण्याची व्यवस्था शासनाकडुन करण्यात यावी, जेणे करून त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने पोषक वातावरण त्या घरात मिळु शकेल.
4) भुमिहीन शेतमजुरांना शेतजमिनीचे वाटप करण्यात यावे व त्यांची शेती कोणी बळकाविणार नाही याची दक्षता शासनाने घ्यावी.
5) भुमिहीन शेतमजुरांचे शोषण थांबविता यावे, यासाठी कायदया व्दारे त्यांना योग्य ते संरक्षण देण्यात यावे.
6) शासनाकडुन राबविल्या जाणाऱ्या विविध शासकिय योजनांचा भुमिहीन शेतमजुरांना पुरेपुर फायदा मिळवुन दयावा.

***संदर्भ ग्रंथ सुची :***

*1) साठे, श्री. तुळमुळे, (2) आदिवासी शेतमजुर आणि अल्प व अत्यल्प भुधारक.*
*2) पळशिकर, श्री. भुस्कुटे, हक्क आणि परिपुर्ती, व्यवस्थापक ग्रंथ निर्मित केंद्र, य. च. म. मु. वि. नाशिक*
*3) पंदेरे य. च. म. मु. वि. नाशिक, 2001*
*4) प्रभाकर देशमुख, भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर, 1987*
*5) प्रदिप आगलावे, आधुनिक भरतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपुर, 1997*
*6) संजय सावळे, (3) भारतीय खेडी : अर्थ व राजकारण ग्रंथ निर्मिती केंद्र, य. च. म. मु. वि. नाशिक, 2002*
*7) गुरूनाथ नाडगोंडे, सामाजिक आंदोलन कॉन्टीनेंन्टल प्रकाशन, पुणे 1986*
*8) ब्रम्हे शुलभा, नेने रा. प. महाराष्ट्रातील शेतमजुर*
*9) बोकरे दिवाकर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, डायमंड पब्लिकेन्सन, पुणे 2008*
*10) कायंदे– पाटील गं. वि. शेतीचे अर्थशास्त्र, चैतन्य पब्लीकेशन, नाशिक 2004*
*11) गुप्ता एम. एन., डॉ. शर्मा डी. डी. प्रतियोगिता साहित्य भवन प्रिंटर्स, आगरा 2003*
*12) तोष्णीवाल, भारतीय समाज, समस्या आणि प्रश्न, विश्व पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर 2009*
*13) देसाई / डॉ. सी. भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे 1986*
*14) विजय कविमंडन, कृषी अर्थशास्त्र श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर 2006*